Email - rathods२५८@gmail.com

International Indexed, Refereed Research Journal, ISSN- 2250-253X, (Print), e-ISSN-2320-544X February,2013

शोध पत्र -

# मराठी ग्रामीण साहित्य : एक दृष्टिक्षेप

* प्रा. डॉ. सुनील आनंदराव राठोड

* श्रीमती कोकाळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर जि. अमरावती

**प्रस्तावना-**

आद्य कवी मुकुंदराजांपासून ते आजपर्यंतच्या साहित्यिकांचे मराठी साहित्याला मोलाचे योगदान लाभले आहे. त्याच्याच योगदानाने मराठी साहित्याचे विश्व समृध्द झाले आहे. प्राचिन साहित्याच्याही आधी लोककथामधून ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते. लोककथेनंतर मराठी साहित्यामध्ये महानुभाव पंथ, नाथ, संप्रदाय, संतकवी, पंडित कवी, शाहिरी इ. साहित्यकृतीच्या रुपाने मराठी साहित्यक्षेत्राला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे.

१९२५ च्या नंतर मराठी साहित्यामध्ये ग्रामीण प्रादेशिक साहित्याची निर्मिती होऊ लागली असे मानल्या जाते. त्यामध्ये काही ठीकाणी ग्रामीण जीवन, ग्रामीण वास्तव प्रकट होतांना दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात अनेक प्रवाह निर्माण झाले यात प्रस्थापितांचे साहित्य, ग्रामीण साहित्य,प्रादेशिक साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, बालसाहित्य, विज्ञान साहित्य,जैन साहित्य, ख्रिस्ती साहित्य अशा अनेक साहित्यप्रवाहांचा समावेश असून यात महत्वाचा प्रवाह म्हणून ग्रामीण साहित्याकडे पाहिले जाते. १९६० नंतर ग्रामीण आणि दलित या दोन प्रवाहांनी आपल्या निर्मितीबरोबर परंपरागत साहित्याला फाटा देऊन आपले एक वेगळे अस्तित्व सिध्द केले. या ग्रामीण साहित्यात ग्रामीण भागाचे भावविश्व त्याच्या सर्व जाणिवासह प्रगट होऊ लागले. काळ बदलला काळाबरोबरच ग्रामीणसाहित्यातही बदल झाला.

विज्ञानाचा प्रचार व प्रसाराने खेडी आपली जूनी कात टाकून नवीन कात धारण करीत आहे, खेडयाचा चेहरा-मोहरा बदलत चालला आहे. रस्ता, विज, शाळा, महाविद्यालय, पोस्ट ऑफिस वर्तमानपत्रे, रेडिओ, टि.व्हि.,मोबाईल, इंटरनेटच्या आगमनाने खेड्यात आमुलाग्र बदल झाला. कुडा-मातीची घरे जाऊन पक्या सिमेंटची मोठ-मोठी इमारती उभ्या राहिल्या शेतीचीही अवजारे बदलली. आधुनिक पध्दतीने शेती होऊ लागली. खेड्यातील समाजजीवनात सामाजिक, राजकिय, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तन झालेले दिसून येते.खेड्यातील संस्कृती ही प्रामुख्याने कृषि संस्कृती असते. ज्या लेखनामध्ये ग्रामजीवनाशी निगडीत विविध गोष्टींचे चित्रण प्रामुख्याने आलेल असेल त्याला ग्रामीण साहित्य म्हणतायेईल.“ग्रामीण जीवनातून फुलणारे,ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य.”[1] असे डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी ग्रामीण साहित्याची व्याख्या केली आहे. ग्रामीण साहित्यातील कथा या साहित्यप्रकाराची संज्ञा स्पष्ट करताना डॉ. आनंद यादव ग्रामीण साहित्याचे अंतरंग उलगडून दाखवतात ते म्हणतात-“खेडेगाव तेथील जीवनपध्दती तेथील चालीरीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेला मानवी पण प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये,मानवी जीवनाला त्या प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक,धार्मिक,विज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्भवणारे प्रश्न आणि समस्या इत्यादी गोष्टीनुसार अनुभूतीला लाभलेली वैशिष्ट्ये त्या कथेत येतात ती त्या खास ग्रामीण अनुभूतीतून जन्माला येते, तिचे ग्रामिणत्व या व इतर अनेक कारणांनी डोळयात भरते. तो अतुभूतीचा अपरिहार्य घटक म्हणून येऊ लागतो व ती कथा ‘ग्रामीण’होते ”[2] यावरुन ग्रामीण या शब्दातील अर्थाची व्यापकता लक्षात येते. ज्या लेखनामध्ये ग्रामीण जीवन आणि ग्रामीण वास्तव नसेल तर ते ‘ग्रामीण साहित्य’होऊ शकणर नाही. ग्रामीण साहित्य तपासून पाहायचे असेल तर त्यामध्ये खेडेगाव, तेथील माती-माणूस तेथील जीवनपध्दती, निसर्ग याचे वास्तववादी चित्रण शोधावे लागेल. या ग्रामीण साहित्याच्या प्रेरणांचा विचार करणे गरजेचे वाटते.१९६० नंतर शिक्षणाच्या प्रसारामुळे लेखकाची नवीन पिढी निर्माण झाली त्यापैकी काहींनी आपल्या आवडीच्या नागर साहित्यिकांचे अनुकरण करण्यास प्रारंभ केला. यासंदर्भात राजीव यशवंते म्हणतात -“ग्रामीण लेखकांच्या प्रेरणा या शहरी मराठी लेखक व त्यांचे साहित्य समोर ठेवणाऱ्या होत्या”[3]

ग्रामीण साहित्याचे लेखन करणारे अनेक साहित्यिक हे मध्यमवगीय व उच्चवर्णीय असल्याने या लेखकांनी शहरी साहित्य समोर ठेवून लेखन केल्याचे दिसून येते. असे जरी असले तरी ग्रामीण कथा, कादंबरी, कविता,नाटके व इतर प्रकारात लिखाण करुन या ग्रामीण साहित्याने आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे.प्रस्थापितांच्या वर्चस्वाने दडपून जाण्यासाठी ही चळवळ आता राहिली नाही. ग्रामीण साहित्याने स्वत:च्या सामर्थ्याने समकालीन साहित्यात आपले स्थान निर्माण केले आहे. ग्रामीण साहित्य हे जीवनजाणिवेतून कळकळीतून ताऊन-सूलाखून निघालेली अभिव्यक्ती होय.

‘ग्रामीण साहित्य’सुरवातीच्या काळात वेगळया नावाने ओळखले जात नव्हते. तसे ओळखले जावे एवढे विपूल लेखनही झाले नव्हते. १९२० नंतर गांधीजींचा उदय झाला आणि त्यातून त्यांनी ग्रामीण जीवनचित्रणास सुरवात केली. सोबतच खेडयामध्ये शैक्षणिक सामाजिक, आर्थिक,कृषिविषयक आणि बौध्दिक विकास होत गेला त्यातून ग्रामीण साहित्याची निर्मीती विपूल प्रमाणात निर्मिती झाली. समाजजीवनात होणारी स्थित्यंतरे कलात्मक पध्दतीने चित्रित करण्याचे काम ग्रामीण लेखकांने केले. गांधीजीनी खेड्याचे भारतीय जीवनातील स्थान नव्या

जाणिवांसह लोकांना पटवून दिले.त्यामुळे लोक खेड्याकडे आकर्षीत झाले.याचाही परिणाम साहित्य क्षेत्रावरही झाला.प्रथमतः लेखकानी खेड्यातील लोकांच्या प्रश्नावर,त्यांच्या समस्यांवर,या समस्या सोडवणुकीवर आणि त्यावरील उपाय योजनेवर लेखन केले.त्यामुळे ग्रामीण जिवनाचा मराठी साहित्यात उघड झाल्याचे दिसते.१९४० मध्ये श्री. म. माटे,श्री. ग.ल. ठोकळ,श्री. र.वा. दिघे यानी ग्रामिण कथा लिहायला सुरवात केली.या लेखकांना ग्रामिण जिवनाचे प्रत्यक्ष अनुभव घेऊन वास्तव जिवनाचे चित्रण केले.यांच्या संदर्भात आनंद यादवांनी "माटे यांना ग्रामिण कथेचे 'हरिभाऊ' म्हटले तर श्री. ग.ल.ठोकळ यांना 'फडके'म्हणावे लागेल कारण श्री. ना.सी. फडके यांना मराठी कथेला जे रुप दिले,तेच स्वरुप ग्रामिण कथेला काही प्रमाणात श्री. ग.ल. ठोकल यांनी दिले."[4]श्री. म.माटे यांनी आपल्या कथेतून माणुसकीचे दर्शन घडविले म्हणून त्यांना ग्रामिण कथेचे हरिभाऊ म्हणने योग्य वाटते.

१९५० नंतर पु.भा.भावे,अरविंद गोखले,द.मा.मिरासदार,गंगाधर गाडगीळ,शंकर पाटील,ग.दि.मांडगुळकर,रंणजीत देसाई,उध्दव शेळके,अण्णाभाऊ साठे,रा.र.बोराडे,दत्ता भोसले अशा अनेक लेखकांनी मराठी ग्रामीण कथेमधून ग्रामीण संसारीची चित्रे उभी केली.खेड्यातील ग्रामीण जीवन दर्शन घडविले आणि साहित्यविश्वाला मोठे केले.

**संदर्भ ग्रंथ**

१. कोतापल्ले नागनाथ,'ग्रामीण आणि प्रादेशिकःस्वरुप विचार,'ग्रामीण साहित्यःस्वरुप आणि शोध,स्वरुप प्रकाशन,औरंगाबाद,तृतीयावृत्ती २००७,प्र.८
२. यादव आनंद ,'मराठी ग्रामीण कथेचा स्वरुप विचार',ग्रामीण साहीत्यःस्वरुप आणि सम्यस्या,मेहता पब्लीशिंग हाऊस, पुणे,तृतीयावृत्ती १९९३,प्र.९
३. यशवंते राजीव, 'ग्रामीण साहित्यःसंकल्पना व चळवळपूर्व पार्श्वभूमी''ग्रामीण साहित्य चळवळःप्रेरणा व स्वरुप',स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद,प्रथमावृत्ती २०१०,प्र.५०
४. यादव आनंद,मराठी ग्रामीण कथेचा स्वरुप विचार',ग्रामीण साहित्यःस्वरुप आणि समस्या, उ.नि.,प्र. १४